अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील उपसंचालक, गट-अ (राजपत्रित) संवर्गातील “जिल्हा नियोजन अधिकारी” व “जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)” या रिक्त पदाचा “अतिरिक्त कार्यभार” सोपविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : इएसटी-१०१७/प्र.क्र.११९/का.१४२७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ४ एप्रिल, २०१८.

परिपत्रक

नियोजन विभागाच्या अधिनस्त असलेल्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील “उपसंचालक, गट-अ (राजपत्रित)” संवर्गातील “जिल्हा नियोजन अधिकारी” व “जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)” या रिक्त असणाऱ्या पदांचा “अतिरिक्त कार्यभार” इतर प्रशासकीय विभागांच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येत असल्याची बाब शासनाचे निदर्शनास आली आहे.

२. “महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८” मधील कलम ३ (चार)(इ) मध्ये नमूद केल्यानुसार, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी “विशेष निमंत्रित” मध्ये “जिल्हा नियोजन अधिकारी” यांचा समावेश करण्यात आलेला आहे. “जिल्हा नियोजन अधिकारी” हे जिल्हा नियोजन समितीचे दैनंदिन कामकाज पार पाडण्याकरीता अत्यंत जबाबदारीचे पद आहे. तसेच “जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)” हे “मानव विकास कार्यक्रम” अधिनस्त विविध योजनांची अंमलबजावणी होण्याकरीता महत्वाची जबाबदारी पार पाडतात.

३. अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील “उपसंचालक, गट-अ (राजपत्रित)” संवर्गातील “जिल्हा नियोजन अधिकारी” व “जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)” ही पदे प्रशासकीय कारणास्तव काही काळ रिक्त राहू शकतात. अशा परिस्थितीत “जिल्हा नियोजन अधिकारी” तसेच “जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)” या पदांचा “अतिरिक्त कार्यभार” इतर प्रशासकीय विभागांच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडे सोपविणे संयुक्तिक ठरत नाही. यास्तव, “उपसंचालक, गट-अ (राजपत्रित)” संवर्गातील “जिल्हा नियोजन अधिकारी” व “जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)” ही पदे काही काळ रिक्त असल्यास त्याचा “अतिरिक्त कार्यभार” या दोन पदांपैकी ज्या पदावर अधिकारी कार्यरत आहे

त्यांचेकडे जिल्हाधिकारी यांनी तात्पुरत्या स्वरुपात सोपवावा. तथापि, "जिल्हा नियोजन अधिकारी" व "जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)" ही दोनही पदे एकाच वेळी रिक्त झाल्यास त्यांचा "अतिरिक्त कार्यभार" ज्येष्ठतेप्रमाणे जिल्हा नियोजन समितीचे "सहायक जिल्हा नियोजन अधिकारी" किंवा "सहायक जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)" यांच्याकडे जिल्हाधिकारी यांनी तात्पुरत्या स्वरुपात सोपवावा. वरीलप्रमाणे "अतिरिक्त कार्यभार" सोपविल्याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून नियोजन विभागास अवगत करणे आवश्यक राहील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१८०४०४१२२२११०५१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya S Mahale

Digitally signed by Pradnya S Mahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=31c8683f52ccbefd97bce49983c4151d2caf1c185c657ea855ac85f31e5f681e, cn=Pradnya S Mahale
Date: 2018.04.04 15:52:03 +05'30'

(प्रज्ञा महाले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
४) उपसंचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) निवड नस्ती.